# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १७** **विषयाबाबतचे निर्णय.**
**मा.प्रशासक ठराव क्रं.५४** **विषय क्रमांक - ५४**
दिनांक : १२/०८ /२०२४ विभाग : सार्व.बांधकाम विभाग.:

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित विकास कामांचा प्रकल्प अहवाल प्रशासकिय मान्यता मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडेस सादर करणेबाबत.

---*---

**ठराव :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान देण्यात येते याबाबतची कार्यपध्दती नगरविकास विभाग , शासन निर्णय क्रमांक धोरण-२०१७/प्र.क्र.९६/ नवि.-१६ दि.१२ डिसेंबर २०१७ व नगरविकास विभाग , शासन निर्णय क्रमांक धोरण-२०१७/प्र.क्र.९६/ नवि.-१६ दि.३० सप्टेंबर २०१७ येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहे. अहमदनगर महानगरपालिकेस खाली नमुद कामांसाठी शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२४/प्र.क्र.५२(१०-३) / नवि-१६ (ई-७३९२२३) दि.१३ मार्च २०२४ नुसार रू.३००.०० लक्ष मंजूर करण्यात आलेले आहेत. यासाठी ७५% निधी राज्य शासन देणार आहे.उर्वरीत २५% रक्कम मनपास खर्च करावा लागणार आहे.

उक्तअटी,शर्ती नुसार नमुद कामाबबत खातरजमा करण्यात आलेली आहे.सदर काम यापुर्वी इतर कोणत्याही निधीतून मागील ५ वर्षाचे कालावधीत झालेले नाही वा प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत. सबब सदर प्रस्तावित विकास कामांच्या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नाव | मंजूर रक्कम (लाखात) | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील मटन मार्केट ते ग्राहक भंडार ते बॉम्बे बेकरीपर्यत सी.सी.रस्ता करणे. | १००.०० | ९९,९९,५७३/- |
| २ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१० | ५०.०० | ४९,९७,९६६/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | मधील कराचीवाला नगर अंतर्गत सी.सी.रस्ता करणे. | | |
| ३ | प्रभाग क्र.१५ मधील लोखंडी ब्रिजलगत कलागते डेअरी ते विटभट्टी थेरात घर ते हुलावळे घर ते लोखंडे घर ते ठुबे घर ते लालबाग घर ते शिवंगी किराणा ते साठे घर ते रजपूत विटभट्टी,आनंदनगर इतर परिसर रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ६०.०० | ५९,९८,६५७/- |
| ४ | प्रभाग क्र.१५ मध्ये समजा नगर चौक ते ढगे मेजर घर ते काटे सर यांचे घर ते चौधरी ते चव्हाण ते हराळ सर यांचे घरापर्यत ३०० एमएम ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० | ९,९९,३४१/- |
| ५ | प्रभाग क्र.१५ मध्ये शिवार्पण अपार्टमेंट ते बुलाखे घर ते पोलिस कॉलनी पर्यत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | १०.०० | ९,९९,५५६/- |
| ६ | भोगे केटर्स ते शिंदे यांचे घर ते पालवे ते कांबळे यांचे घरापर्यत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ३०.०० | २९,९८,५०८/- |
| ७ | प्रभाग क्र.१५ मध्ये शिंतोळे यांचे घर, ढोकळे सर यांचे घर ते समता नगर चौक ते नागवडे यांचे घर व हराळ यांचे घरापर्यत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ४०.०० | ३९,९९,५३१/- |
| | **एकुण =** | **३००.००** | **२,९९,९३,१३२/-** |

उक्त प्रस्तावित ७ विकास कामांचा एकुण रक्कम २,९९,९३,१३२/- (अक्षरी रक्कम रू.दोन कोटी नव्व्यान्नव लाख त्र्यान्नव हजार एकशे बत्तीस मात्र.) प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळणेकामी जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवणेकामी मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १७** **विषयाबाबतचे निर्णय.**
**मा.प्रशासक ठराव क्रं.५५** **विषय क्रमांक - ५५**
दिनांक : १२/०८ /२०२४ विभाग : पाणी पुरवठा विभाग.:

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका,दोन मेगावॅट सौरउर्जा निर्मिती प्रकल्प (DPDC) या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुदीचे पुर्नविलोकन करणे बाबत.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेसाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत २ मेगावॅट सौरउर्जा निर्मिती प्रकल्पास रक्कम रू.९,९९,६४,९७२/- मान्यता मिळाली असून सदरचा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. खालील तक्त्यात नमुद केलेल्या ठिकाणी सौर उर्जा निर्मिती प्रकल्प उभारवायचे असून या कामांच्या निविदा अंतीम करून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | प्रकल्प स्थळ | भाग १ करिता आवश्यक रक्कम (GSTसह) | भाग २ करिता आवश्यक रक्कम (GSTसह) | म.न.पा.ने करावयाच्या कामांकरिता आवश्यक रक्कम (GSTसह) | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | फ-याहबाग STP प्लॅन्ट | ४,९१,३५,९३७/- | ५९,३६,३८६/- | २०,८९,१०८/- | ५,७१,६१,४३१/- |
| २ | बुरूडगांव कचरा डेपो | २,५८,६१,०३५/- | ५९,३६,३८६/- | १३,४२,२४३/- | ३,३१,३९,६६४/- |
| ३ | सावेडी कचरा डेपा | १,५५,१६,६२१/- | ५९,३६,३८६/- | १४,५५,९२३/- | २,२९,०८,९३०/- |
| ४ | नालेगांव अमरधाम | १,२९,३०,५१७/- | ५९,३६,३८६/- | १२,७७,२८२/- | २,०१,४४,१८५/- |
| ५ | प्रकप्ल व्यवस्थापन सल्लागार शुल्क | -- | -- | -- | २५,४३,७९३/- |
| | | | | | १३,५८,९८,००३/- |

उपरोक्त नमुद कामांसाठी आज अखेर पर्यत रू.२.९८ कोटी इतका खर्च झालेला असून पुढील काम प्रगती पथापवर आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये २ मेगा वॅट सौर उर्जा प्रकल्प (DPDC) या लेखाशिर्षका अंतर्गत खालील प्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षक | तरतूद |
|---|---|---|
| १ | २ मेगा वॅट सौर उर्जा निर्मिती प्रकल्प (DPDC) | रू.२.०० काटी |

सद्यस्थितीत फ-याबागSTP प्लॅन्ट येथील कामाचे रक्कम रू.१,३७,६८,०९५/-चे दुस-या धावते देयक प्रस्तावित करण्यात आले आहे.तसेच सावेडी कचरा डेपो येथील कामाचे रू,७५,०८,५५३/- इतक्या रकमेचे देय प्राप्त आहे.परंतु उपरोक्त नमुद लेखाशिर्षका मध्ये मात्र रू.६२,३१,९०५/- इतकीच तरतूद शिल्लक असल्याने सदरचे देयक प्रस्तावित करणे शक्य होत नाही.

विषयांकीत कामासाठी माहे.नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यत मुदत असल्याने प्रस्तावित केलेली तरतुदीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.यासाठी अमृत / नगरोत्थान राज्यस्तर पाणी पुरवठा योजना,मनपा हिस्सा कर्ज या लेखाशिर्षकाची तरतुद कमी करून विषयांकित कामासाठी वापरणे शक्य आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे. (लक्ष मध्ये )

| अ.नं. | लेखाशिर्षक | अंदाजपत्रकातील तरतुद | कमी/जास्त करावयाची तरतुद | सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|
| १ | अमृत /नगरोत्थान राज्यस्तर पाणी पुरवठा योजना/मनपा हिस्सा/कर्ज | रू.३०००.०० | (-) रू.१०००.०० | रू.२०००.०० |
| २ | २ मेगा वॅट सौर उर्जा निर्मितीप्रकल्प (DPDC) | रू.२००.०० | (+) रू.१०००.०० | रू.१२००.०० |

वरील प्रमाणे नमुद केले नुसार लेखाशिर्षकांच्या तरतुदीमध्ये बदल केल्यास विषयांकित कामासाठी तरतुद उपलब्ध होवून सदरचे काम पुर्ण करणे शक्य होईल व अंदाजपत्रकामध्ये वाढ देखील होणार नाही.करिता दोन मेगावॅट सौरउजा निर्मिती प्रकल्पाचे काम पुर्ण करणेच्या अनुषंगाने दोन मेगावॅट सौरउर्जा निर्मिती प्रकल्प (DPDC) या लेखाशिर्षकामध्ये वरील तक्त्यात नमूद केलेनुसार दुरूस्ती करणेस मा.स्थायी समिती सभेने केलेल्या शिफारसीस मा.प्रशासक सर्व साधारण सभेची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.